# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **केंद्र शासनाच्या National Informatics Center (NIC) या विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिकेने ई-ऑफिस प्रणाली सर्व विभागात कार्यान्वित केल्याने महापालिकेस प्रशस्तीपत्र देऊन करण्यात आले सन्मानित**

- **ई-ऑफीस प्रणाली यशस्वी कार्यान्वित केल्याने महानगरपालिका सर्व अधिकाऱ्यांचे मा. आयुक्त यांनी केले अभिनंदन**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनानुसार महापालिका सर्व विभागाच्या कामातील पारदर्शकता वाढविण्याकरिता, विभागांचे प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व पारदर्शक होण्याकरीता ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करून महापालिकेचा कारभार हा पेपरलेस करण्यात आलेला आहे. त्यासाठी स्वतंत्र ई- ऑफीस विभागाची स्थापनासुद्धा करण्यात आली आहे. मा. आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार उपायुक्त संजय शिंदे व सिस्टम मॅनेजर राज घरत यांनी महानरगपालिकेच्या सर्व विभागात ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या Ministry of electronics & information technology अंतर्गत National Informatics Center (NIC) या विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिकेने ई-ऑफिस प्रणाली सर्व विभागात कार्यान्वित केल्याने महापालिकेस प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले आहे.

15 ऑगस्ट 2023 रोजी ई-ऑफिस प्रणालीची नोंदणी करून 15 दिवसांमध्ये संगणक व उद्यान विभागाचे कामकाज ई-ऑफिस पद्धतीने सुरू करण्यात आले. तदनंतर टप्प्या टप्प्याने महापालिकेतील इतर विभागांचे कामकाज ई-ऑफीस प्रणालीने सुरू करून दिनांक 16 ऑक्टोबर 2023 रोजी पर्यंत सर्व विभागांचा कारभार पेपरलेस करण्यात आला आहे. ई-ऑफीस प्रणाली बाबत वर्ग 1 ते वर्ग 3 मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना National Informatics Center (NIC) यांच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांमार्फत नियमित प्रशिक्षण देण्यात आले. तदनंतर यशदा पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत ई-ऑफिस प्रशिक्षणामध्ये 250 वर्ग 1 ते वर्ग 3 मधील कर्मचाऱ्यांचे नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्यापैकी 125 कर्मचाऱ्यांचे ई-ऑफिसचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. दिनांक 08 नोव्हेंबर 2023 रोजी 32 कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे 5 बॅच मध्ये ई-ऑफिस प्रशिक्षण पूर्ण करण्यात येणार आहे. सर्व विभागांचा कारभार हा पेपरलेस करणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरल्या कारणाने महापालिका अति. आयुक्त, उपायुक्त व अधिकारी वर्ग यांनी मा. आयुक्त यांचे अभिनंदन केले. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी ई-ऑफीस प्रणाली यशस्वी कार्यान्वित झाल्याने अति. आयुक्त (माहिती तंत्रज्ञान) संभाजी पानपट्टे, उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान) संजय शिंदे, सिस्टम मॅनेजर राजघरत व महापालिकेतील सर्व अधिकाऱ्यांना त्याचे श्रेय देऊन सर्वांचे अभिनंदन केले आहे.